

# शेती पुरक आळींबी लागवड व्यवसाय निर्मिती

**उद्योजक शेतकरी महीलेचे नाव : कु. प्रणाली दिलीपराव मोडक**

पत्ता : मु.पो. मांगलादेवी ता. नेर परसोपंत यवतमाळ

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक : ०९१३०४५६९६

वय : २३ वर्ष

शिक्षण : पदवीधर (कृषि)

जमीन धारकता : ५ एकर

## १. कृषि विज्ञान केंद्राचे शेती पुरक आंळींबी लागवड व्यवसायाकरीता मार्गदर्शन

**कु. प्रणाली दिलीपराव मोडक** कृषी पदविधर असून आई वडीलांना आर्थीक मदत म्हणून **आळींबी लागवडीचा पुरक व्यवसाय** करण्याचा निश्चय केला. कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ यांच्या तांत्रीक मार्गदर्शनातून प्रशिक्षण घेवून **आळींबी लागवड** करण्यास सुरूवात केली. कृ.वि.के, यवतमाळ यांच्या माध्यमातुन दि. १४ नोव्हेंबर २०१८ रोजी आयोजीत मशरूम (आळींबी) लागवड तंत्रज्ञान या विषयावरील आयोजीत प्रशिक्षण कार्यक्रमातील सखोल ज्ञानाचा अवलंब करून मशरूम (आळींबी) सुरूवात केली.

## २. शेती पुरक मत्स्य व्यवसायातून साध्य

- यशस्वीपणे मशरूम व्यवसायाची सुरूवात १५ जानेवारी २०१९ पासून केली.
- कच्चे शेडचे क्षेत्रफळ २० X १२ आहे.
- अळींबी लागवड या व्यवसायला सुरूवात करून ६ महीने झाले आहे. या ६ महीण्यात ३ बॅचेस काढल्या आहेत.त्यामध्ये एका मशरूमच्या बॅचनिर्मीती करीता अंदाजे ५०० बेड निर्मीती करण्यात आली एका बॅचची मशरूम लागवडीच्या बेड संख्या ५०० असून ६ महीण्यात ३ बॅचेस ची एकुण बेड संख्या १५०० होती मजुरी ते व्यवस्थापण व विज बिल या करीता प्रत्येकी एका बॅचचा खर्च १५००० रू. येतो तर ६ महीण्यात ३ बॅचचा खर्च ४५००० हजार आला.
- पहील्या बॅचमध्ये ५०० बेडवरील ३०० किलो मशरूम मिळाले आहे. दुसऱ्या बॅच मध्ये ३०० ते ४०० च्या दरम्यान तर तिसऱ्या बॅचमध्ये ४०० किलो ताजे मशरूम मिळाले आहे.या तिन महीण्यात ३ बॅचेस पासून सरासरी ११०० ते १२०० किलो मशरूम मिळाले. मिळालेल्या मशरूम पासून कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ च्या मदतीने मशरूमचे प्रक्रीया युक्त पदार्थ तयार करण्यात आले. त्यामध्ये कच्चा शेडमध्ये सादरकाजू जातीचे ऑयस्टर मशरूमची लागवड करीत आहे. व विक्रीचे दर ताजे मशरूम १ किलो ४०० रू दराने विकत आहे. सुके (ड्राय मशरूम) १ किलो १००० रू दराने विकत आहे. तसेच मशरूम मुग पापाड १०० ग्रॅम ३० रू दराने विकत आहे. मशरूम लोणचे (गोड) १०० ग्रॅम ४० रू दराने तर मशरूम लोणचे (तिखट) १०० ग्रॅम ५० रू दराने विकत आहे. तसेच मशरूम पावडर २० ग्रॅम ३५ रू दराने व मशरूम सुप २० ग्रॅम ४० रू दराने विकत आहे व मशरूम नानखटाई ६ नग २० रू दराने विकला.
- प्रक्रीया युक्त पदार्थाचे उत्पन्न सरासरी ७०,००० ते ८०,००० रू. निवळ नफा वर्षाकाठी मिळाला.












डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ

ICAR

प्रमाणपत्र

श्री/श्रीमती प्रणाली दिलीपराव मोडक, मु.पो. मांगलादेवी, नेर(प.सोपंत)

यांनी दिनांक १४ नोव्हें, २०१८ रोजी कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ व्दारा आयोजित

"अळिंबी लागवड तंत्रज्ञान"

या विषयावरील प्रशिक्षण सत्रात सक्रिय सहभागी होऊन प्रशिक्षण पुर्ण केल्याबद्दल त्यांना हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

दिनांक :-

विषय विशेषज्ञ
कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ

कार्यक्रम समन्वयक
कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ